**थकीत खावटी कर्ज माफ करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग,**
**शासन निर्णय क्र.खाकयो-२०१८/प्र.क्र.१५/का.३.**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ६ जून, २०१९.

**वाचा** :-

(१) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.खाकवा-२००४/प्र.क्र.९६/भाग-२/का-८, दि.२०.०७.२००४.

(२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.खाकवा-२००५४/प्र.क्र.८०/का-८, दि.२४.०६.२००५.

(३) आदिवासी विकास विभाग, शा़सन निर्णय क्र.खाकवा-२००४/प्र.क्र.९६/का-८, दि.०९.०८.२००५.

(४) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.खाकवा-२००६/प्र.क्र.९६/का-८, दि.१९.०५.२००६.

(५) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.खाकवा-२००७/प्र.क्र.८२/का-८, दि.०६.०६.२००७.

(६) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.खाकवा-२००८/प्र.क्र.६२/का-८, दि.२२.०४.२००८.

(७) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.खाकवा-२००७/प्र.क्र.१३९/का-८, दि.१९.०६.२००९.

(८) व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांचा अहवाल दि.१६.०५.२०१८ व दि.१७.१०.२०१८.

(९) व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांचा अहवाल क्र.आविम/विप/खावटी/माफी प्रस्ताव/६०६३, दि.२१.१२.२०१८.

**प्रस्तावना** :-

आदिवासी भागात सावकार व व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या आदिवासी लोकांची पिळवणूक थांबविण्यासाठी महाराष्ट्र आदिवासी आर्थिक स्थिती (सुधारणा) अधिनियम, १९७६ पारित करुन सावकारी बंद करण्यात आली. तसेच पावसाळयात माहे जून ते सप्टेंबर या कालावधीत रोजगार उपलब्ध होत नाही म्हणून आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी (अल्प भूधारक, भूमिहीन व शेतमजूर) यांना आर्थिक अडचण निर्माण होऊ नये तसेच या कालावधीत (माहे जून ते सप्टेंबर या कालावधीत) त्यांची उपासमार होऊ नये म्हणून सन १९७८ पासून खावटी कर्ज योजना सुरु करण्यांत आली आहे. सदर योजना महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचेमार्फत राबविण्यात येत होती. त्यासाठी निधी शासनाकडून आदिवासी विकास महामंडळास उपलब्ध करुन देण्यात आला.

आदिवासींच्या आरोग्यात सुधारणा करणे, त्यांना आरोग्य विषयक सुविधा पुरविणे, विविध रोजगार विषयक कार्यक्रमांअंतर्गत वर्षभर पुरेल एवढा रोजगार उपलब्ध करुन देणे, आदिवासींना पिण्याचे शुध्द व पुरेसे पाणी उपलब्ध करुन देणे, अन्नधान्य पुरवठा सुनिश्चित करुन पुरक आहार देणे आणि या सर्व उपाययोजनांद्वारे आदिवासींचे क्रियाशिल आयुष्य वाढविणे हा नवसंजीवन योजनेचा प्रमुख उद्देश आहे. या योजनेअंतर्गत विविध घटक कार्यक्रमांचा समावेश करण्यांत आलेला आहे. त्यामध्ये खावटी कर्ज योजनेचा समावेश आहे.

खावटी कर्ज योजनेनुसार कुटूंबातील युनिटनुसार म्हणजे कुटूंब संख्या ४ युनिटपर्यंत रु.२,०००/-, ५ ते ८ युनिटपर्यंत रु.३,०००/-, ८ युनिटच्या पुढे रक्कम रु.४,०००/- यानुसार वाटप करण्यांत येत होते. खावटी कर्ज योजनेंतर्गत खावटी कर्ज वस्तुरुपाने व ३० टक्के अनुदान रोख व धनादेशाद्वारे व ७० टक्के कर्ज असे या योजनेचे स्वरूप होते. खावटी कर्जे वसुली वाढविण्यासाठी महामंडळाचे क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी आदिवासी सहकारी संस्था यांचेशी सतत संपर्क ठेऊन पाठपुरावा करतात. तथापि, अनेक आदिवासी कुटूबांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने कर्जाची परतफेड करु शकले नाही. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दुष्काळसदृश्य परिस्थिती, पाणी टंचाई यामुळे शेतीमधील कमी उत्पादने यामुळे खावटी कर्जाची वसुली होत नसल्याचे दिसून येते.

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दुष्काळ सदृश्य परिस्थिती,पाणी टंचाई त्यामुळे शेतीमधील कमी उत्पन्न असल्यामुळे कर्ज फेडीची क्षमता शेतकऱ्यांमध्ये नव्हती. त्यामुळे सन २००९ मध्ये सन २००४-०५ ते २००८-०९ या कालावधीतील रु.१८४.३७ कोटी थकीत असलेले खावटी कर्ज थकबाकी माफ करण्याचा निर्णय यापूर्वी घेण्यात आलेला आहे.

सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीत ११८०२२५ लाभार्थ्यांना रु.२५९.०६ कोटी इतक्या रकमेचे खावटी कर्ज वाटप करण्यात आलेले आहे. त्यापैकी रु.१४.४६ कोटी रकमेची वसुली झाली असून, उर्वरित ११२५९०७ लाभार्थ्यांकडून रु.२४४.६० कोटी इतक्या रकमेची थकबाकी आहे. सदर योजनेतील लाभार्थी दारिद्रयरेषेखालील, शेतमजूर अशा संवर्गातील असून त्यांच्याकडे कर्जवसुलीसाठी कुठलीही स्थावर व जंगम मालमत्ता नाही. खावटी अनुदान व कर्जवाटपाचा प्रमुख हेतु पावसाळयात त्यांना उपासमार न होता क्रियाशील आयुष्य जगता यावे, गरीब आदिवासींची उपासमार होऊ नये, त्यांना पावसाळयात रोजगार नसल्याने पर्यायी व्यवस्था व्हावी, स्थलांतरण थांबविणे व मानवी विकास निर्देशांक (Human Development Index) वाढविणे हा होता. आदिवासींची उपरोक्त परिस्थिती लक्षात घेऊन सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीतील रु.२४४.६० कोटी (रुपये दोनशे चव्वेचाळीस कोटी साठ लाख फक्त) कर्ज व रु.११६.५७ कोटी (रुपये एकशे सोळा कोटी सत्तावन्न लाख फक्त) व्याज अशी एकूण रु.३६१.१७ कोटी इतक्या रकमेचे खावटी कर्ज माफ करण्याबाबतचा निर्णय मा. मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :-

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांनी सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीत रु.२४४.६० कोटी (रुपये दोनशे चव्वेचाळीस कोटी साठ लाख फक्त) कर्ज व रु.११६.५७ कोटी (रुपये एकशे सोळा कोटी सत्तावन्न लाख फक्त) व्याज अशी एकूण रु.३६१.१७ कोटी रक्कम माफ करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार योजनेतील लाभार्थ्यांच्या ७/१२ किंवा कर्ज व व्याजाच्या रक्कमेची नोंद आहे अशा संबंधित अभिलेखावर नोंद घेण्यात येऊन ७/१२ वर आवश्यक ते बद्दल करण्यासाठी महसुल विभागाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा वापर करण्यात यावा.

२. सदर शासन निर्णयास वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१२६/ व्यय-१४, दि. २७ मार्च, २०१९ नुसार मान्यता आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०६०६१५०६१९१२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Laxmikant Gopalrao Dhoke

Digitally signed by Laxmikant Gopalrao Dhoke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=413beeca50b65438c7a037917ccf1f24d8ca684b6564 0df6372ea731ffac4dfc, cn=Laxmikant Gopalrao Dhoke
Date: 2019.06.06 15:10:06 +05'30'

**( ल.गो.ढोके )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
२) मा.मंत्री (आदिवासी विकास), यांचे खाजगी सचिव.
३) मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास), यांचे खाजगी सचिव.
४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, यांचे स्वीय सहाय्यक.
६) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव (सहकार), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) महासंचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
१६) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
१७) आयुक्त, सहकार पुणे.
१८) सर्व विभागीय आयुक्त.
१९) सर्व जिल्हाधिकारी.
२०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
२१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक.
२२) सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास.
२३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२४) कोषागार अधिकारी, सर्व जिल्हे.
२५) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

२६) वित्त विभाग (अर्थसंकल्प-१७/व्यय-१४/अर्थसंकल्प-३/अर्थोपाय/कोषा प्रशासन-५), मंत्रालय, मुंबई.
२७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
२८) जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.
२९) संचालक (लेखा व कोषागारे), संगणक कक्ष, नवीन प्रशासन विभाग, मुंबई.
३०) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक/नागपूर.
३१) सर्व प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ.
३२) सर्व सह सचिव/उप सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३३) सर्व कार्यासने, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३४) निवडनस्ती, कार्यासन क्र.३, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

#####